विद्यार्थी, पालकांची गर्दी : करिअरच्या विविध संधींच्या माहितीचे दालन खुले, सोमवारपर्यंत प्रदर्शनाची संधी

# 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर'चा प्रारंभ

**कोल्हापूर** : शिक्षण व करिअरचे सर्वोत्तम पर्याय, सर्वांगीण सल्ला व उपाय एकाच छताखाली असणाऱ्या 'रोबामेट प्लस' प्रस्तुत 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर - २०१६'ला शनिवारी उत्स्फूर्त प्रतिसादात प्रारंभ झाला. प्रत्यक्ष संवाद साधून विविध अभ्यासक्रमांबाबत मार्गदर्शन, शंकांचे निरसन होत असल्याने या शैक्षणिक प्रदर्शनाला पहिल्याच दिवशी विद्यार्थी, पालकांनी गर्दी केली. ग्लोबल करिअरच्या अजोड संधींची माहिती देणारे हे दालन उद्या, सोमवारपर्यंत खुले राहणार आहे.

करिअर निवडीसाठी विद्यार्थ्यांना 'लोकमत'ने शिक्षणाचे विविध पर्याय 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर'च्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहेत. राजारामपुरीतील डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात या प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी 'महेश ट्युटोरियल लक्ष्य'चे कोल्हापूर शाखाप्रमुख प्रा. अभिजित शर्मा, विपणन व्यवस्थापक संदीप गोसावी, विभागीय प्रमुख प्रा. गजानन वेरुळकर, केजीएस एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे डॉ. व्ही. जे. काकणकी, कुलसचिव गोरखनाथ देशमुख, शिवगंगा-सुझुकीचे संचालक सुरेश काशीद, शुभांगी काशीद, डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे उपप्राचार्य वीरेन भिर्डी, दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी लिमिटेडचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक के. डी. जोशी, जी. एल. आपटे प्रमुख उपस्थित होते. 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख यांनी स्वागत केले. 'सखी मंच'च्या संयोजिका प्रिया दंडगे यांनी सूत्रसंचालन केले. इव्हेंट विभागप्रमुख दीपक मनाठकर यांनी आभार मानले.

प्रदर्शनामध्ये कोल्हापूरसह राज्यातील विविध भागांतील नामांकित शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या आहेत. त्यांच्या स्टॉलवर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी, पालकांशी संवाद साधून त्यांना अभ्यासक्रमांची माहितीसह मार्गदर्शन केले जात आहे. चित्रफितीद्वारे अभ्यासक्रम, संस्थेच्या कॅम्पस्‌ची माहिती देण्यात येत आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन होण्यापूर्वी विद्यार्थी, पालकांनी गर्दी केली होती. सकाळच्या सत्रात 'कोल्हापूर एज्युकेशन आयडॉल-३' या सामान्यज्ञान स्पर्धेत युवक-युवतींच्या बुद्धीचा कस लागला. यानंतर झालेल्या प्रा. रवी निकम, ऋतुपर्ण करकरे, समीर नागटिळक व अभिजित शर्मा यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांना विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. पारंपरिक विद्याशाखांहून वेगळ्या क्षेत्रात करिअर करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल आहे. ते लक्षात घेऊन या प्रदर्शनात विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या आहेत. प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक 'रोबोमेट प्लस' हे असून डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग हे सहप्रायोजक आहेत, तर दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी लिमिटेड, ट्रिनिटी, शिवगंगा सुझुकी हे सहायक प्रायोजक आहेत. (प्रतिनिधी)

आदित्य वेल्हाळ




शिक्षण व करिअरचे सर्वोत्तम पर्याय, सर्वांगीण सल्ला एकाच छताखाली असणाऱ्या 'रोबामेट प्लस' प्रस्तुत 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर-२०१६' प्रदर्शनाला शनिवारी विद्यार्थी, पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात प्रारंभ झाला.

## कोल्हापूरसह राज्यातील शिक्षण संस्थांचा सहभाग

प्रदर्शनात महाविद्यालये, शाळा, मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, ग्राफिक्स, फॅशन व इंटेरिअर डिझायनिंग व रिटेल, आयटीआय, एव्हिएशनपासून मीडिया, ॲनिमेशन, गेमिंगपर्यंतची माहिती उपलब्ध होत आहे. तसेच विविध विद्यापीठे, प्रोफेशनल क्लासेस, हॉटेल मॅनेजमेंट, फॉरेन लँग्वेजिस, स्पोकन इंग्लिश, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, कॅपिटल मार्केट यासह मुंबई, पुणे, नागपूर या शहरांतील अनेक नामवंत संस्था प्रदर्शनात सहभागी झाल्या आहेत.

## कुलगुरू शिंदे यांनी घेतली माहिती

- प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विविध स्टॉलला भेटी दिल्या. यात वैद्यकीय, अभियांत्रिकीमधील कोणत्या शाखांकडे विद्यार्थ्यांचा कल आहे.
- ॲनिमेशनमध्ये नव्या कोणत्या संगणकप्रणालींचा वापर होतो. ग्राफिक्स्, फॅशन व इंटेरिअर डिझायनिंगमधील नवे अभ्यासक्रम, आदींची बारकाईने माहिती घेतली.
- काही स्टॉलधारकांना त्यांनी अभ्यासक्रम, आदींबाबत सूचना देखील केल्या.




## चांदीच्या नाण्यांचे मानकरी

प्रदर्शनामध्ये दर तासाला एका विद्यार्थ्याला चांदीचे नाणे जिंकण्याची संधी आहे. याअंतर्गत शनिवारी दिवसभरात रसिका वालिर्बे, विराज नांचे, ओंकार सुतार, संदेश पोलादे, अनुज पाटील, नेहा बाहोलकर, कैलाश दुधणकर, आर. एस. खोत यांनी नाणी जिंकली. या नाण्यांचे प्रायोजक हे गोपीनाथ अनंत चिपडे सराफ ॲण्ड सन्स् आहेत.

## प्रदर्शनात आज

- सकाळी ११ वाजता : डॉ. चारुदत्त रणदिवे (मुलांच्या क्षमतेनुसार करिअर कसे निवडावे?)
- दुपारी १२. ३० वाजता : चातक देशपांडे (बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी)
- सायंकाळी ५ वाजता : डॉ. सुरेंद्र सिंग (आता शिक्षण झाले अधिक सोपे)
- सायंकाळी ६ वाजता : व्ही. एस. मोरसे (डिप्लोमा इंजिनिअरमधील करिअर संधी)

## 'सायन्स पंडित' चित्रकला स्पर्धा आज

'लोकमत युवा नेक्स्ट' आणि 'बाल विकास मंच'तर्फे प्रदर्शनात आज, रविवारी सकाळी जागतिक पर्यावरणदिनानिमित्त चित्रकला स्पर्धा होणार असून, ती सर्वांसाठी खुली आहे. यानंतर दुपारी दोन वाजता विज्ञानावर आधारित 'सायन्स पंडित' स्पर्धा होणार आहे. त्यासाठी चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन हे प्रायोजक आहेत.

लोकमत

5 JUN 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

आदित्य वेल्हाळ




कोल्हापुरात शनिवारी 'लोकमत ॲस्पायर एज्युकेशन फेअर-२०१६' चे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी 'महेश ट्युटोरियल लक्ष्य'चे प्रा. अभिजित शर्मा, केजेस् एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे डॉ. काकणकी, शिवगंगा सुझुकीचे सुरेश काशीद, डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगचे उपप्राचार्य वीरेन भिर्डी, शिवगंगा सुझुकीच्या संचालक शुभांगी काशीद, 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख, केजेस् एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे कुलसचिव गोरखनाथ देशमुख उपस्थित होते./वृत्त २ वर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
5 JUN 2016

# हिंदी भाषा जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याची गरज : डॉ. पद्मा पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हिंदी भाषेत विपूल साहित्य आणि संशोधन होत आहे. त्यामुळे ही भाषा जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याची गरज आहे, असे मत डॉ. पद्मा पाटील यांनी येथे व्यक्त केले.

मुंबई हिंदी विद्यापीठ आणि केंद्रीय हिंदी निदेशालय यांच्या वतीने हिंदी भाषा प्रचार व प्रसार तसेच बाळकृष्ण बागवे ज्येष्ठ हिंदी सेवा सन्मान या कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण उपसंचालक एम. के. गोंधळी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. पाटील बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुंबई हिंदी विद्यापीठाचे कुलपती डॉ. बलदेव सिंह चौहान होते. यावेळी शिक्षण उपसंचालक गोंधळी, शौकत अली कादरी, कुलपती डॉ. चौहान यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डीवाएसपी दीपक कांबळे, किशोर बागवे, मंगलकुमार शिंदे, महादेव लिंबीतोटे, अखतर हुसेन पटेल, मिलिंद रावळ, राजेंद्र सोनवणे मधुकर वायदंडे, परिणिता कांबळे, सुधाकर वायदंडे यांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स
6 JUN 2016

# विद्यापीठ करणार कागदाचा पुनर्वापर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामार्फत पर्यावरण संवर्धनांतर्गत कागदाच्या पुनर्वापराबाबत पर्यावरण मित्र संकल्पना वापरण्यात येणार आहे. निरुपयोगी कागदपत्रांचा कचरा कचऱ्याच्या टोपलीत न टाकता पर्यावरण मित्र पेटीत टाकण्याच्या सूचना सर्व अधिविभागांना देण्यात आल्या आहेत. 'सेव्ह पेपर, सेव्ह एन्व्हायरमेंट' या उक्तीप्रमाणे विद्यापीठाने एक आदर्श पाऊल टाकले आहे.



विदापीठच्या अधिविभागांमध्ये आणि मुख्य कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाजासाठी कागदाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. यामधून निर्माण होणारी रद्दी कचऱ्याचा टोपलीत टाकण्यात येते. हा कचरा जाळला जातो. त्यामुळे पर्यावरणाचे प्रदूषण वाढून कागद निर्मिती करण्यासाठी अमर्याद वृक्षतोड करावी लागते. त्यामुळे यावर लक्ष केंद्रीत करून विद्यापीठाने 'पर्यावरण मित्र' संकल्पना राबविण्यात येणार आहे. मोहिमेतील सहभागाचा प्रशासकीय गुणवत्ता अभियानाच्या मूल्यांकनामध्ये विचार करण्यात येणार आहे. या योजनेतंर्गत जमा झालेला सर्व कागदपत्रांचा कचरा परीक्षा विभागाशी करार झालेल्या ठेकेदारांकडे पाठविण्यात येणार आहे. त्यातुन कागदाचा पुर्नवापर करता येणार आहे.

मात्र, कागदाचा पुनर्वापर करताना कार्यालयातील अतीगोपनीय असणारी किंवा कार्यालयात जतन करुन ठेवण्यात येणारी महत्त्वाची कागदपत्रांचा यामध्ये समावेश होऊ नये याची दक्षता घेण्यासंबंधी दक्षता घेण्याची सूचनाही केल्या आहेत.

केमिकलचा वापर करुन रिकाम्या झालेल्या केमिकल बॉटल व ब्रोकन ग्लासवेअरचा विक्रीसाठी विद्यापीठाशी करार झाला आहे. त्यामुळे सर्व विभागांनी रंगीत व पारदर्शक काचसाहित्य वेगळे साठवून पुनर्वापरासाठी ठेकेदारांमार्फत कार्यवाही केली जाणार आहे. त्यासाठी भांडार विभाग पुरेसा साठा झाल्यानंतर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

पुढारी

4 JUN 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सेव्ह पेपर...सेव्ह एन्व्हायरन्मेंट!

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम : यापुढे कागदाचा होणार पुनर्वापर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणाशी सुसंगत असा आदर्श उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला आहे. सर्व विभागांनी कागदाचा वापर कमीत कमी करावा. तसेच निरुपयोगी कागदाचे बारीक तुकडे करून तो पर्यावरण मित्र संकल्पनेतून निर्माण केलेल्या पेटीत टाकावा, असे आदेश परिपत्रकाच्या माध्यमातून व्यवस्थापनाकडून देण्यात आले आहेत. यापुढे कागद रद्दीत घातले जाणार नसून त्याचा पुनर्वापर केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाने सामाजिक दायित्वाचा भाग म्हणून पर्यावरणपूरक एक चांगली सुरुवात केली आहे. पर्यावरण मित्र ही संकल्पना प्रशासनांतर्गत प्रशासनाकडून राबवण्यात येणार आहे. या संकल्पनेंतर्गत यापुढे कागदाचा वापर जपून आणि योग्य रीतीने करण्याचे आवाहन केले आहे. याबाबतचे परिपत्रक सर्व अधिविभागांना पाठवण्यात आले आहे. यामध्ये म्हटले आहे की, प्रशासनात कागदाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. यामध्ये कचरा म्हणून टाकून दिलेला कागद जाळला जातो. यामुळे प्रदूषण होते. तसेच कागद हा झाडांपासून बनवला जात असल्याने कागदाचा जादा वापर म्हणजे जादा वृक्षतोड असा हा प्रकार आहे.




शिवाजी विद्यापीठातून

- विद्यापीठाची पर्यावरण मित्र संकल्पना
- सहभागी असणाऱ्यांचे गुणवत्ता मूल्यांकन
- कागदासह काचेच्या बाटल्यांचाही पुनर्वापर

यापुढे पर्यावरण मित्र ही संकल्पना राबवली जात आहे. यासाठी निरुपयोगी कागद कचऱ्याच्या पेटीत टाकू नयेत, तर यासाठी खास पर्यावरण मित्र पेटी ठिकठिकाणी ठेवण्यात येणार आहे. या पर्यावरण मित्र पेटीत हे कागद बारीक तुकडे करून टाकावेत. या कागदांचा लगदा करून त्याचा वतीने पुनर्वापर केला जाणार आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक काम होणार आहे. कागदासह काचेच्या बाटल्यांचाही पुनर्वापर केला जाणार आहे. या उपक्रमात सहभागी असणाऱ्यांना प्रशासकीय गुणवत्ता अभियानाच्या मूल्यांकनामध्ये विचार केला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विद्यापीठातर्फे कृतिशील पाऊल यानिमित्ताने टाकले आहे.



जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 6 JUN 2016

# 'पुन्हा स्मृतिगंध'मधून अस्सल जीवनानुभव'

**म. टा. प्रतिनिधी,कोल्हापूर**

'मानवी भावभावनांचे यथार्थ चित्रण करणाऱ्या डॉ. जी. पी. माळी यांच्या पुन्हा स्मृतिगंध या ग्रंथातून अस्सल जीवनानुभवाचे प्रकटीकरण घडते. जीवनातील सुख-दुःखे, आनंदाचे क्षण, जीवनाला कलाटणी देणाऱ्या घटना अशा आयुष्यातील विविध टप्प्यावर भेटलेल्या व्यक्तींप्रती कृतज्ञतेची भावना ठेवत माणुसकीची माळ तयार केली. जीवनातील सच्चा अनुभवांचा पट उलगडणाऱ्या 'पुन्हा स्मृतिगंध'मधून जगण्याची आणि जगवण्याची प्रेरणा तर लाभतेच शिवाय स्नेहभाव वाढीस लावणारा हा ग्रंथ आहे.' असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमधील मराठी विभागप्रमुख डॉ. जी. पी. माळी यांच्या 'पुन्हा स्मृतिगंध' या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते झाले. माजी खासदार निवेदिता माने कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि अक्षर दालन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



डॉ. जी. पी. माळी यांच्या 'पुन्हा स्मृतिगंध' ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत अमेय जोशी, डॉ. ल. रा. नसिराबादकर, श्रीमती निवेदिता माने, डॉ. माळी, डॉ. अनिल गवळी.

**डॉ. जी. पी. माळी लिखित पुस्तकाचे प्रकाशन**

ज्येष्ठ समीक्षक डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणाले, 'परिस्थिती बदलली की माणसे भूतकाळ विसरतात, उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत डॉ. जी. पी. माळी यांनी आयुष्याच्या जडणघडणीत ज्यांनी पाठबळ दिले, पाठ थोपटली त्यांच्याविषयी आठवणी जागविल्या आहेत. त्यांच्या लिखाणातून माणुसकीच्या नात्याचे दर्शन घडते. कृतज्ञतेचा भाव, अंतरंगाचा ओलावा जाणवतो. माणूस हा वाङमयाच्या केंद्रबिंदू असतो हे या ग्रंथाने अधोरेखित केले. पुन्हा स्मृतिगंधमधून मानवी जीवनातील नीतीमूल्ये, सदाचार, सद आचारांचा सुवास दरवळत राहणार आहे.'

माजी खासदार श्रीमती निवेदिता माने यांनी साहित्य आणि समाज यांचा अतूट संबंध आहे. लेखकाने समाजातील चांगुलपणाचे दर्शन घडवले असल्याचे नमूद केले. डॉ. जी. पी. माळी म्हणाले, 'शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने सांगली, सोलापूर, बेळगाव, कोल्हापूर या चार नगरांशी माझा निकटचा संबंध आला. या कालावधीतील भावविश्व रेखाटले आहे. आयुष्याभरातील माणसे हीच माझी श्रीमंती असून, पुन्हा स्मृतिगंध म्हणजे चांगल्या अनुभवांचे संचित आहे.'

प्रा. डॉ. अनिल गवळी यांनी स्वागत केले. डॉ. अनुराधा कुलकर्णी यांनी ग्रंथातील एका प्रकरणाचे अभिवाचन केले. प्रा. माधवी सोळांकूरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.प्रशांत नागांवकर यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. मोहन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य सुरेश गवळी, प्रविण चौगले, हरिष भालेराव, डॉ. आर. एस. आडसूळ, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. डी. ए. देसाई, एस. व्ही.माळी, अजित सूर्यवंशी, प्रकाशक अमेय जोशी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

6 JUN 2016

# ‘पुन्हा स्मृतिगंध’ हे पुस्तक मानवी मनाचा ठाव घेते

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : डॉ. जी. पी. माळी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दुसऱ्याशी स्नेहबंध जोडून ‘पुन्हा स्मृतिगंध’ हे प्रा. डॉ. जी. पी. माळी यांनी लिहिलेले पुस्तक एक अनुभव प्रवास आहे. या पुस्तकात माणसांच्या वाटचालीसह वेदना, व्यथा, आठवणी, अनुभव, आनंदी क्षण, ऋणानुबंध असा मिलाप पहायला मिळतो आहे. हे पुस्तक वाचल्यानंतर माळी यांच्याकडे मनाचा ठाव घेणारी निरीक्षणशक्ती आणि संशोधनवृत्ती किती प्रबळ आहे याची प्रचिती येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी केले.

डॉ. माळी लिखित ‘पुन्हा स्मृतिगंध’ या पुस्तकाचे डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व अक्षर दालन यांच्यातर्फे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कोळेकर तिकटीनजिकच्या अक्षर दालनात प्रकाशन सोहळा झाला. अध्यक्षस्थानी माजी खासदार निवेदिता माने होत्या.




कोल्हापूर : ‘पुन्हा स्मृतिगंध’चे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी अमेय जोशी, डॉ. ल. रा. नसिराबादकर, निवेदिता माने, डॉ. जी. पी. माळी व डॉ. अनिल गवळी.

डॉ. माळी यांनी आपल्या मनोगतामध्ये पुस्तक लिहिताना भावलेल्यांची क्षणांचे विनोदी अंगाने कथन केले.

डॉ. ल. रा. नसिराबादकर, माजी खासदार माने यांचेही भाषण झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्राचार्य सुरेश गवळी, आरती भोसले, प्रविण चौगुले, माजी प्राचार्य हरिष भालेराव, डॉ. प्रकाश कुंभार, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. डी. ए. देसाई, प्रा. जे. के. पवार, प्रा. आर. एस. अडसूळ आदी उपस्थित होते.

डॉ. अनिल गवळी यांनी स्वागत करुन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ. अनुराधा कुलकर्णी यांनी पुस्तकातील एका प्रकरणाचे वाचन केले. प्रा. माधवी सोळांकूरकर यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. प्रशांत नागावकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUN 2016

# शिवाजी विद्यापीठात आज 'ग्यान' उपक्रमास प्रारंभ

## कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन, तंत्रज्ञान वर्कशॉपचे उद्घाटन होणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठात सोमवार, ६ जून रोजी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाच्या म्युझियम कॉम्प्लेक्स इमारतीचे भूमिपूजन आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या वर्कशॉपचे उद्घाटनही या प्रसंगी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोमवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

### 'ग्यान' व्याख्यानांचे लाईव्ह वेबकास्टिंग

ग्यान उपक्रमांतर्गत अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांची सोमवार, ६ ते ११ जून या कालावधीत व्याख्याने होणार आहेत. या सर्व व्याख्यानांचे लाईव्ह वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. त्यामुळे निवडक सहभागी विद्यार्थ्यांच्या बरोबरीनेच इतर इच्छुकांनाही त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घेता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

- 6 JUN 2016

# आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी 'ग्यान'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे ग्लोबल इनीशिएटीव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) उपक्रमाला सोमवारपासून (ता. ६ जून) शिवाजी विद्यापीठात सुरुवात होत आहे. चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टिमअंतर्गत (सीबीएस) अधिक प्रभावी व दर्जेदार काम होणार आहे. एक व दोन क्रेडिटचे अनुक्रमे सात व बारा दिवसांचे अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. अभ्यासक्रमांमध्ये जगातील अन्य विद्यापीठांचे निम्मे विद्यार्थी प्रवेश घेणार आहेत. 'ग्यान'द्वारे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी शैक्षणिक संबंध प्रस्तापित करण्याची संधी मिळणार आहे.

**दृढ शैक्षणिक संबंधातून मिळणार तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

केंद्रीय उच्चशिक्षण मंत्री स्मृती इराणी यांनी गोव्यातील शिक्षण तज्ज्ञांच्या परिषदेत आंतरराष्टीय स्तरावरील संधोधकांच्या ज्ञानाचा लाभ सार्वजनिक विद्यापीठातील विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी 'ग्यान' उपक्रमाची घोषणा केली होती. उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यापीठाने यूजीसीकडे नऊ प्रस्ताव पाठविले. त्यातील तीन प्रस्तावांना दिल्लीतील बैठकीत मान्यता देण्यात आली. उर्वरीत प्रस्तावांना प्राथमिक मंजुरी दिली आहे.



विद्यापीठात या सर्व अभ्यासक्रमांचे सात डिसेंबरपर्यंत शिक्षण देण्यात येणार आहे. ५० प्रवेश क्षमता असलेल्या अभ्यासक्रमांमध्ये ५० टक्के प्रवेश इतर विद्यापीठातील शिक्षक, संशोधक व विद्यार्थ्यांसाठी असतील. त्यांना विविध देशातील वैज्ञानिक, शिक्षक दोन आठवडे मार्गदर्शन करतील. सात ते बारा दिवस चालणाऱ्या अभ्यासक्रमांचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार आहे. त्याचा वापर नॅशनल डिजिटल लायब्ररीसाठी वापर होणार आहे. भविष्यात त्यावर अधारीत लघू अभ्यासक्रम राबविण्याचा युजीसीचा मानस आहे. उपक्रमाला विद्यापीठात सोमवारपासून (ता. ६) सुरुवात होणार आहे. आठवड्याच्या उपक्रमात पर्डयू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे हे 'दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर' भौगोलिक माहिती प्रणाली व 'जलस्रोतांचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

5 JUN 2016

# विद्यापीठात उद्यापासून 'ग्यान' उपक्रमास प्रारंभ

- उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती
- म्युझियम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन व तंत्रज्ञान वर्कशॉपचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. ६) राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते तसेच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता होणार आहे. यावेळी विद्यापीठाच्या म्युझियम कॉम्प्लेक्स इमारतीचे भूमिपूजन आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या वर्कशॉपचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते केले जाणार असल्याची माहिती शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड बदल होत आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे हा आग्रह विद्यापीठाचा आहे. याचअनुषंगाने ग्यान या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. जागतिक कीर्तीचे शिक्षक, उद्योजक, वैज्ञानिक यांना भारतीय शिक्षण व्यवस्थेत काही कालावधीसाठी आमंत्रित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. ग्यान उपक्रमाची नोडल एजन्सी म्हणून खरगपूर आयआयटी काम पाहात आहे. ग्यान अंतर्गत निवडलेल्या शिक्षण संस्थांमध्ये विविध देशांतील तज्ज्ञांनी एक ते दोन आठवडे प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षक व संशोधकांनाही सहभागाची मुभा आहे. कमी कालावधीत ग्यानअंतर्गत विद्यापीठाला सात अभ्यासक्रमास मंजुरी मिळाली. सात अभ्यासक्रमांना मंजुरी मिळालेले शिवाजी विद्यापीठ एकमेव आहे. विद्यापीठाच्या संशोधन कार्याला मिळालेली ही पोचपावती आहे. या उपक्रमांतर्गत ६ ते ११ जून या कालावधीत मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटन कार्यक्रमाचे बीजभाषण अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे हे करणार आहेत. भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) व जलस्रोतांचे व्यवस्थापन असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय असणार आहे. प्रौढ व निरंतर शिक्षण विभागासमोरील जागेवर म्युझियम कॉम्प्लेक्स भूमिपूजन तसेच तंत्रज्ञान अधिविभागाच्या आधुनिक वर्कशॉपचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. पत्रकार परिषदेस बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ग्यानचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. एस. एस. पन्हाळकर आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाला सरकारकडून ४७ कोटींची प्रतीक्षा

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव वर्षानिमित्त तत्कालीन राज्य सरकारने विद्यापीठास पन्नास कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निधीपैकी फक्त तीन कोटी रुपयांपर्यंतच निधी विद्यापीठास प्राप्त झाला आहे. सध्या नवीन सरकारने या निधीतील उर्वरित ४७ कोटी रुपये तत्काळ द्यावेत म्हणजे शैक्षणिक विकासकामांना गती देता येईल, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मंत्री तावडे यांच्याकडे या निधीबाबत चर्चा होईल, अशी अपेक्षा आहे.

## University Plans Seven Lectures This Year

# First GIAN talk at SUK today on managing water

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** As the lecture series under the Global Initiative of Academic Networks (GIAN) kicks off here on Monday, as many as seven professors will have spoken at Shivaji University, Kolhapur (SUK), by the end of 2016.

Dr Venkatesh Merwade, from Purdue University, USA, will be delivering the first lecture. He will be speaking about geographic information system (GIS) for water resources management and the varsity has received over 100 applications from across the country for the talk. SUK officials said the lecture will be available through webcasting as well.

### Catch the talk online

Those interested in hearing Dr Venkatesh Merwade's talk on geographic information system (GIS) for water resources management, can watch it online through live webcasting from 10 am onwards on Monday. The link is as follows: **http://cloud.india.com/shivaji-university**

SUK vice-chancellor Devanand Shinde said Dr Merwade's is an important topic given the drought in Maharashtra. "Merwade's topic is about water resource management, which is the need of the hour," said Shinde.

GIAN coordinator at SUK, R K Kamat, said the university has already prepared a schedule as per which all international experts are to finish their lectures by the end of December. He added that the experts' sessions may last between seven to 12 days and will account for at least one international credit.

"A local faculty member from the university will act as a local host for the expert. After the end of the course, a test will also be conducted based on which credits will be granted," he said.

Only 50 students will be attend the lecture and 50% of them will be from other universities.

He added that the Indian Institute of Technology, Kharagpur, is the nodal agency for the first initiative of GIAN. "Only 20 universities in India have been selected for GIAN and SUK is among them. The selection criteria was based on the National Assessment and Accreditation Council (NAAC) grade and important memorandum of understandings (MoUs)," said Kamat.

The VC also said the ministry of human resource development will provide the international experts with an honorarium of $8,000. "The initiative is likely to help create international exposure for students as well as faculty members, which will help with their research," he said.

## Varsity to seek pending funds from Tawde

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** State education minister Vinod Tawde's visit to the Shivaji University, Kolhapur (SUK) on Monday will present an opportunity to the officials to press for their demands of pending funds and starting new courses in the division.

When asked about Tawade's visit and what the university plans to demand, SUK vice-chancellor Devanand Shinde said the varsity has started many skill development courses on the campus and in a few colleges in the division. However, it is time to extend their reach with mobile skill development courses, he said.

"Rather than students reaching the campus, how about the campus reaching out to them by means of mobile skill development courses? It can cover many villages and remote areas across Sangli, Satara and Kolhapur districts and bring in more talent," the vice-chancellor said.

G S Kulkarni, deputy registrar, said the SUK will be demand pending funds from the education department. "The state issued a resolution on January 17, 2013, granting the university Rs 3.19 crore," he said.

"The varsity has an 853-acre campus, which is still unexplored. For the golden jubilee year, we had proposed a school of nanotechnology, Yashwantrao Chavan Centre for rural development studies, a museum and a convention centre. With availability of funds, the remaining works can be completed on time," he added.

**Meeting on MCA course validity:** University authorities on Tuesday will meet the principals of colleges in the division offering MCA commerce to discuss the validity of the course. The Savitribai Phule Pune University (SPPU) has cancelled admissions to the MCA commerce course from 2016-17 academic year citing accreditation issues.

D R More, director, Board of Colleges and University Development, SUK, said that the university has taken cognisance of the issue and Tuesday's meeting will discuss possible steps that need to be taken.

"It is quite likely that colleges offering the course and students who opted for the MCA commerce course will be merged with MCA science faculty due to accreditation issues by the All India Council for Technical Education," said More.

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUN 2016

# 'ग्यान'चे उद्या विद्यापीठात उद्‌घाटन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत ग्लोब इनिशिएटीव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) उपक्रमाचे शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. ६) सकाळी दहा वाजता शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. कार्यक्रमास पालकमंत्री चंद्रकांत पाटील, अमेरिकेतील पर्डयू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार बैठकीत दिली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते म्युझियम कॉम्प्लेक्स इमारतीचे भूमिपूजन होणार आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'जागतिकीकरणाच्या अनुषंगाने उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल होत आहेत. उच्च शिक्षणामध्ये जागतिक पातळीवर देशातील विद्यार्थी सर्वसमावेशक असावेत, यासाठी भारताच्या केंद्रीय विकास मंत्रालयाने 'ग्यान' उपक्रमाला सुरुवात केली आहे. या उपक्रमांतर्गत जगातील वैज्ञानिक, शिक्षक, उद्योजक आणि विद्यार्थ्यांना भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेत अल्पकालीन प्रशिक्षणासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. यासाठी 'नॅक' मूल्यांकनामध्ये विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांचा समावेश केला आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली असून, राज्यातील पहिला 'ग्यान' उपक्रम सुरू होणार आहे.'

'उपक्रमांतर्गत सहा ते ११ जूनअखेर मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले आहे. पहिल्या सत्रात अमेरिका येथील पर्डयू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे 'भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस)', 'जलस्रोतांचे व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान देणार आहे. याबरोबरच विद्यापीठातील प्रौढ व निरंतर शिक्षण विभागासमोरील जागेत म्युझियम कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार आहे. या कॉम्प्लेक्स व तंत्रज्ञान अधिविभागातील आधुनिक वर्कशॉपचेही उदघाटन मंत्री तावडे यांच्या हस्ते होणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पत्रकार बैठकीस बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, 'ग्यान'चे समन्वयक डॉ. आर. के. कामत, संयोजक डॉ. पी. डी. राऊत, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. एस. एस. पन्हाळकर उपस्थित होते.

## 'ग्यान' व्याख्यानांचे लाइव्ह वेबकास्टिंग

'ग्यान' उपक्रमांतर्गत अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांची ६ ते ११ जून २०१६ या कालावधीत व्याख्याने होणार आहेत. व्याख्यानांचे लाइव्ह वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. त्यामुळे निवडक सहभागी विद्यार्थ्यांच्या बरोबरीनेच इतर इच्छुकांनाही त्यांच्या व्याख्यानांचा लाभ घेता येणार आहे. http://cloud.india.com/shivaji-university या लिंकच्या माध्यमातून हे वेबकास्टिंग होणार आहे, अशी माहिती 'ग्यान' समन्वयक डॉ. आर.के. कामत यांनी दिली.



लोकमत 5 JUN 2016

जनसंपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्या 'ग्यान'चे उद्घाटन

## म्युझियम कॉम्प्लेक्स भूमिपूजन : विनोद तावडे, चंद्रकांतदादांची उपस्थिती

**कोल्हापूर :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठात उद्या, सोमवारी सकाळी दहा वाजता उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, जगाच्या पाठीवर वैज्ञानिक, शिक्षक आणि उद्योजक यांना भारतीय उच्च शिक्षणव्यवस्थेत अल्पकालीन प्रशिक्षणासाठी आमंत्रित करणे हा 'ग्यान'चा उद्देश आहे. याबाबतची घोषणा केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी देशातील सर्व आयआयटीजच्या बैठकीत २९ जून २०१४ या दिवशी केली. 'ग्यान'च्या पहिल्या टप्प्यात नामांकित आयआयटी, आयआयएम व नॅक 'अ' मानांकित विद्यापीठे अशा शैक्षणिक व संशोधनाचा आलेख उच्च प्रतीचा असणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा समाविष्ट करण्याचे ठरले. यामध्ये आयआयटी खरगपूरची 'ग्यान'साठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे.

शैक्षणिक व संशोधनातील कार्यामुळेच शिवाजी विद्यापीठाला 'ग्यान'अंतर्गत सात अभ्यासक्रम मंजूर झाले आहेत. इतके अभ्यासक्रम मंजूर होणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे. या उपक्रमांतर्गत येत्या ६ ते ११ जून या कालावधीत मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले आहे. त्याचे उद्घाटनपर बीजभाषण अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे करणार आहेत. 'भौगोलिक माहिती प्रणाली (जी. आय. एस.)' व 'जलस्रोताचे व्यवस्थापन' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे.

विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण विभागासमोरील जागेवर म्युझियम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन व तंत्रज्ञान अधिविभागाच्या आधुनिक वर्कशॉपचे उद्घाटनही उच्च शिक्षण मंत्री तावडे व पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहितीही डॉ. शिंदे यांनी दिली.

यावेळी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, 'ग्यान'चे समन्वयक डॉ. आर. के. कामत, संयोजक डॉ. पी. डी. राऊत, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. एस. एस. पन्हाळकर, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
6 JUN 2016

# शिवाजी विद्यापीठात आज 'ग्यान' उपक्रमाचे उद्घाटन

## मंत्री विनोद तावडे यांची उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठात केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) उपक्रमाचे सोमवारी (दि. ६ जून) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

म्युझियम कॉम्प्लेक्स इमारतीचे भूमिपूजन आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या वर्कशॉपचे उद्घाटनही यावेळी होणार आहे. सकाळी दहा वाजता हा कार्यक्रम राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात होईल.



शिवाजी विद्यापीठातून

### लाईव्ह वेबकास्टिंग

डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांची ६ ते ११ जून या कालावधीत व्याख्याने होणार आहेत. या सर्व व्याख्यानांचे लाईव्ह वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. http://cloud.india.com/shivaji-university या लिंकच्या माध्यमातून वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUN 2016


# 'ग्यान' उपक्रमाचे उद्या उद्‌घाटन

## कुलगुरू डॉ. शिंदे : तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे, डॉ. मेरवाडे यांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पुढाकाराने सुरू झालेल्या ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अ‍ॅकॅडमिक नेटवर्क्स (ग्यान) उपक्रमाचे उद्‌घाटन सोमवारी (ता. ६) शिवाजी विद्यापीठात होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे, अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांची प्रमुख उपस्थिती असेल. - जगातील नामवंत वैज्ञानिक, शिक्षक आणि उद्योजकांना भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत अल्पकालीन प्रशिक्षणासाठी 'ग्यान'अंतर्गत निमंत्रित केले जाते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

ते म्हणाले, "विद्यापीठाच्या म्युझियम कॉम्प्लेक्स इमारतीचे भूमिपूजन आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या वर्कशॉपचे उद्‌घाटनही मंत्री तावडे यांच्या हस्ते होईल. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचीही उपस्थिती असेल. सकाळी दहा वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृहात हा कार्यक्रम होईल. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल घडत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आपले विद्यार्थी जगाच्या पातळीवर ताठ मानेने उभे राहावेत, असा उद्देश समोर ठेवून केंद्र सरकारने 'ग्यान' उपक्रम आकारास आणला आहे. आयआयटीज्च्या बैठकीत मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी ही घोषणा केली होती. पहिल्या टप्प्यात नामांकित आयआयटी, आयआयएम व नॅक 'अ' मानांकित



विद्यापीठांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे. 'ग्यान'अंतर्गत निवडलेल्या संस्थांमध्ये वेगवेगळ्या देशांतील नामांकित, तज्ज्ञ व्यक्ती एक किंवा दोन आठवड्यांचे प्रशिक्षण देतील.

आयआयटी खरगपूर ही नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. नॅकचे 'अ' मानांकन मिळाले असल्याने शिवाजी विद्यापीठात हा उपक्रम राबविला जाणार आहे. ११ जूनपर्यंत हा उपक्रम चालेल. डॉ. मेरवाडे (अमेरिका) यांचे बीजभाषण होईल. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'भौगोलिक माहिती प्रणाली व जलस्रोतांचे व्यवस्थापन' हा व्याख्यानाचा विषय आहे. ग्यानअंतर्गत सात अभ्यासक्रम मंजूर झाले असून, जागतिकीकरणाच्या दिशेने विद्यापीठाची घोडदौड सुरू आहे, असे उद्‌गार कुलगुरू शिंदे यांनी काढले.

अत्यंत कमी कालावधीत इतक्या मोठ्या प्रमाणात अभ्यासक्रम मंजूर होणारे हे देशातील एकमेव विद्यापीठ असल्याचा दावाही त्यांनी केला. बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, 'ग्यान'चे समन्वयक डॉ. आर. के. कामत, संयोजक डॉ. पी. डी. राऊत, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. एस. एस. पन्हाळकर आदी उपस्थित होते.

---

**१३ हजार झाडांची किमया;** तीन वर्षांत २४०० टन ऑक्सिजनचे उत्सर्जन, ९०० टन कार्बनचे शोषण

# शिवाजी विद्यापीठ परिसर बनला कोल्हापूरचा 'प्राण'

**संतोष मिठारी ● कोल्हापूर**

कार्बन डायऑक्साईड वायू शोषून घेऊन ऑक्सिजनचा (प्राणवायू) पुरवठा करणारा शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा कोल्हापूर शहराचा 'प्राण' बनला आहे. विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने विद्यापीठातील झाडांच्या कार्बन शोषून घेण्याच्या क्षमतेचा अभ्यास केला. त्यातून विद्यापीठातील १३२१७ झाडांकडून गेल्या तीन वर्षांत सुमारे २४०० टन ऑक्सिजनचे उत्सर्जन, तर, ९१२ टन कार्बन शोषून घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

या विभागाने विद्यापीठाच्या ८५२ एकर क्षेत्रांतील वृक्षगणना आणि संपूर्ण परिसराच्या कार्बन ग्रहण क्षमता मापनाचा शास्त्रीय अभ्यास केला आहे. यातून १३२१७ वृक्षांची नोंद केली. तसेच त्यांचे जैव-वस्तुमान (बायोमास) काढण्यात आले. शिरीष झाडाचा सर्वाधिक २०३९ टन बायोमास दिसून आला. त्यापाठोपाठ ऑस्ट्रेलियन बाभूळ (३२२), गिरिपुष्प (२१६), सुबाभूळ (१६०), निलगिरी (१३४) यांचा बायोमास आहे. गेल्या तीन वर्षांत एकूण झाडांकडून ९१२ टन कार्बन शोषून घेण्यात आला आहे. तसेच २४०० टन ऑक्सिजनचे उत्सर्जन झाले आहे. वर्षागणिक त्यात झाडांच्या वाढीनुसार १० ते १५ टक्क्यांनी वाढ होते. शहरातील अन्य परिसराच्या तुलनेत विद्यापीठातील तापमान अर्ध्या ते एक अंशाने कमी दिसून आले. शिवाय पाणी शोषून घेण्याची क्षमता, शुद्ध हवा उपलब्ध झाली आहे. विद्यापीठातील ऑक्सिजनचे उत्सर्जन आणि कार्बनच्या शोषणाचे वाढते प्रमाण हे शहराच्या वातावरणासाठी उपयुक्त ठरणारे आहे.



### झाडांची आकडेवारी

- विद्यापीठातील एकूण झाडांची संख्या : १३२१७
- एकूण प्रजातींची संख्या : ९७
- प्रजातींनुसार झाडांची संख्या :

गिरिपुष्प : ४३६८ सुबाभूळ : १८६९
कडूलिंब : ८९८ नीलगिरी : ७९८,
रेन ट्री : ६८१ अन्य झाडे : ४६०३

### राष्ट्रसंघाच्या संस्था सूत्रानुसार विश्लेषण

या वृक्षगणनेमध्ये चार फुटांपेक्षा उंच आणि दहा सेंटिमीटरपेक्षा अधिक परीघ असलेल्या झाडांची गणना केली असल्याचे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी सांगितले.

ते म्हणाले, गणनेसाठी गुगल अर्थ आणि विद्यापीठाच्या नकाशाद्वारे विद्यापीठ परिसराचे ४६ विभाग केले. वृक्षगणनेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण संरक्षण संस्थेच्या सूत्रानुसार वृक्षांच्या ऑक्सिजनचे उत्सर्जन व कार्बन ग्रहण क्षमतेच्या शास्त्रीय विश्लेषणाचे काम केले आहे. विद्यापीठातील संबंधित झाडे एका वर्षाला २६४३४ लोकांच्या प्राणवायूची गरज भागवितात. हे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यापीठात आमच्या विभागातर्फे वृक्षारोपणावर भर दिला जात आहे. विभागासह संगीत नाट्यशास्त्र विभागाच्या तलावाशेजारी रोटरी क्लबच्या सहकार्याने वृक्षारोपण केले आहे. पर्यावरणशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी 'दत्तक झाड' योजना राबविली जाते.

यात एक विद्यार्थी एका झाडाची जोपासना करतो. त्याची व्याप्ती वाढविली जाणार आहे.

# पंचगंगा प्रदूषणमुक्तीचा उपक्रम कृतिशील

» पान १ वरून

नदीच्या पाण्याची गुणवत्ता' आणि 'गो ग्रीन व्हिलेज' या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हा परिषदेमधील राजर्षी शाहू सभागृहात झाला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, ''मानवी जीवनात आई आणि पर्यावरण या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पर्यावरण जतनाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. 'गो ग्रीन व्हिलेज'मधील ग्रीन रंग म्हणजे हिरवा रंग. हा रंग समृद्धीचा आहे. पर्यावरणाच्या समृद्धीचा तो प्रतीक आहे. नवकल्पनेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास निश्चितच पंचगंगा नदीचे प्रदूषण थांबवता येईल. कोल्हापूरच्या जनतेने व येथील अधिकाऱ्यांनी हे दाखवून दिले आहे. त्यामुळे पंचगंगा खोरे प्रदूषणमुक्तीसाठी आजपासून सुरू केलेला उपक्रम पुढील वर्षभरात निश्चित यशस्वी होईल.''

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार म्हणाले, ''भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवतेचे स्थान दिले आहे. त्यामुळे त्याच्या जतनाची जबाबदारी आपली सर्वांची आहे. पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी सुरू केलेला हा उपक्रम निश्चितच नदीला प्रदूषणमुक्तीकडे घेऊन जाणारा आहे. त्यासाठी सर्व ग्रामसेवक, सरपंच आणि पदाधिकारी प्रयत्न करतील. भविष्याचा विचार करून प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार महत्त्वाचा आहे.''

मुख्य संपादक श्रीराम पवार म्हणाले, ''पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न २५ वर्षांपासून आहे. 'सकाळ'ने सर्व शासकीय यंत्रणा, सामाजिक संघटना आणि लोकसहभागाच्या माध्यमातून तो सोडविण्यास सुरवात करून एक पॉझिटिव्ह ॲक्टिव्हिजमची सुरवात केली. प्रदूषणमुक्तीसाठीचे पाऊल पडण्यास सुरवात झाली आहे. या दोन उपक्रमांच्या माध्यमातून नदी खोऱ्यातील १७४ गावे प्रदूषणमुक्त होण्यास मदत होईल.''

जिल्हा परिषद अध्यक्ष विमल पाटील म्हणाल्या, ''पंचगंगा नदी जीवनदायिनी असून तिचे प्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे. 'सकाळ' व सर्व शासकीय यंत्रणांच्या मदतीने राबवत असलेल्या या उपक्रमात सर्व ग्रा.पं. व सदस्य सहभागी होतील.''

उपाध्यक्ष शशिकांत खोत म्हणाले, ''प्रदूषणमुक्तीसाठी उचललेले हे पाऊल सकारात्मक दिशेने जाणारे आहे. गावपातळीवर प्रदूषण रोखण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. वित्त आयोग किंवा जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी दिल्यास त्याचा उपयोग करून प्रदूषणमुक्तीकडे जाता येईल.''

पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी हे उपक्रम कशा पद्धतीने राबविण्यात येतील, याची माहिती उपस्थितांना दिली. या वेळी शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते. कार्यकारी संपादक मनोज साळुंखे यांनी आभार मानले.

**'गो ग्रीन व्हिलेज' ही देशात पहिली संकल्पना असावी, जी 'सकाळ'च्या माध्यमातून जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने राबविली जात आहे. 'सकाळ'ने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या या संकल्पनेला जिल्हा प्रशासनाचे पूर्ण सहकार्य राहील. जिल्हा परिषदेकडून याची रूपरेषा ठरविली जाईल. 'सकाळ'ने यापूर्वीही पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी उत्तम प्रयत्न केले आहेत. त्याला नागरिकांनीही भरभरून साथ दिली. त्याचे परिणामही चांगले दिसून येत आहेत. 'गो ग्रीन व्हिलेज' मोहिमेअंतर्गत जर गावेच प्रदूषणमुक्त होत असतील, तर पंचगंगा आपोआपच प्रदूषणमुक्त होईल. लोकांनी उपक्रमात उत्स्फूर्त सहभागी व्हावे.**

-**डॉ. अमित सैनी,** जिल्हाधिकारी, कोल्हापूर

## 'सकाळ' समाजाचे ऋण फेडतोय

**सकाळ माध्यम समूह नेहमीच सामाजिक उपक्रम राबवत असतो. पंचगंगा नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न सुटावा म्हणून सातत्याने लोकसहभागातून प्रयत्न करत आहे. लोकसहभाग, जिल्हा परिषदेला सोबत घेऊन 'सकाळ'चे सुरू असलेले हे कार्य म्हणजे समाजाचे ऋण फेडणेच आहे, असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आवर्जून सांगितले.**

# पंचगंगा प्रदूषणमुक्तीचा उपक्रम कृतिशील

## कुलगुरू डॉ. शिंदे : 'सकाळ', जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, शिवाजी विद्यापीठातर्फे प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : "पंचगंगा नदी खोरे प्रदूषणमुक्तीसाठी 'सकाळ'ने सर्वांच्या सहकार्याने सुरू केलेला 'आमच्या हाती नदीच्या पाण्याची गुणवत्ता' आणि 'गो ग्रीन व्हिलेज' हे उपक्रम म्हणजे प्रदूषणमुक्तीचा कृतिशील आराखडा आहे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

'सकाळ', जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त 'आमच्या हाती

पान ९ वर »




**कोल्हापूर : 'सकाळ', जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त 'आमच्या हाती नदीच्या पाण्याची गुणवत्ता' आणि 'गो ग्रीन व्हिलेज' या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हा परिषदेमधील राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी झाला. यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. या वेळी डावीकडून मनोज साळुंखे, श्रीराम पवार, विमल पाटील, डॉ. कुणाल खेमणार, शशिकांत खोत, उदय गायकवाड आदी.**

(**संजय देसाई** : सकाळ छायाचित्रसेवा)

### जलप्रदूषण रोखण्यास काय करणार?

'सकाळ' माध्यम समूहाने समृद्ध पर्यावरण निर्मितीच्या दृष्टिकोनातून सुरू केलेल्या उपक्रमांना आपण वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. पंचगंगा नदी प्रदूषण मुक्ती तसेच दाजीपूर अभयारण्य स्वच्छता मोहिमेसाठी हजारो हात एकवटले. आता वेळ आली आहे एका वज्रनिर्धाराची जल प्रदूषण मुक्तीच्या संकल्पाची. चला तर आजच निर्धार करूया जल प्रदूषण न करण्याची शपथ घेऊया.

- जल प्रदूषण टाळण्याचा तुम्ही कोणता निर्धार केला आहे ते आम्हाला कळवा.
- तुमच्या प्रतिक्रियांना 'सकाळ'च्या ऑनलाईन माध्यमांमध्ये विशेष स्थान देऊ.

www.facebook.com/sakalkolhapur
twitter @kolhapursakal
whatsapp ९१४६१९०१९१

**गाव, नदी स्वच्छतेचा संकल्प**

टुडे पान १ वर »